दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)





पुणे || वर्ष २ रे || अंक २४६ || बुधवार २१ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवास हरिनाम गजरात प्रारंभ
# गोकुळाष्टमी सप्ताहात भाविकांना आळंदीत धार्मिक पर्वणी

पुणे विशेष प्रतिनिधी
( सुहास सावंत )

श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात श्रीकृष्ण आणि माऊली जन्मोत्सव सोहळा गोकुळाष्टमी सप्ताहांतर्गत विविध धार्मिक कार्यक्रमांनी मंगळवारी ( दि.२० ) पासून हरिनाम गजरात प्रारंभ झाला. या निमित्त आळंदीत भाविकांना धार्मिक पर्वणी लाभणार आहे.ङ्ग श्रीकृष्ण व माऊली जन्मोत्सवा निमित्त आळंदी मंदिरात २० ते २७ ऑगस्ट २०२४ या कालावधीत मंदिरातील प्रथा परंपरांचे पालन करीत विविध धार्मिक कार्यक्रम आणि कीर्तन-प्रवचन सेवा होत आहे. राज्यातील नामवंत कीर्तनकार-प्रवचनकार यांची सेवा तसेच गाथा भजन आदी सुश्राव्य सेवा आळंदीत मिळणार आहे. श्रींचे जन्मोत्सवात गाथा पूजन व आरती आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ञ राजेंद्र उमाप यांचे हस्ते झाली. यावेळी विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथजी, मानकरी योगीराज कुऱ्हाडे, चोपदार बाळासाहेब रणदिवे, राजाभाऊ रंधवे, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने, राजाभाऊ चौधरी, माऊली निंबाळकर आदी उपस्थित होते. मंदिरातील धार्मिक महत्त्व लक्षात घेत आळंदी देवस्थानने कार्यक्रम आणि माऊली मंदिरात विद्युत रोषणाईसह पुष्प सजावट देखील गोकुळाष्टमी दिनी करण्याची तयारी झाल्याचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. ङ्ग श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान





कमिटीच्या वतीने मंदिरातील प्रथा परंपरांचे पालन करीत गोकुळाष्टमी उत्सव साजरा केला जातो. सप्ताहाचे काळात मंदिरात दुपारी चार ते पाच दरम्यान प्रवचन सेवा होणार आहे. माऊली जन्मोत्सवातील प्रवचनकारांमध्ये चैतन्य महाराज कबीर यांची सप्ताह प्रारंभ दिनी प्रवचन सेवा आणि कीर्तनकारांमध्ये ह.भ.प.शंकर बडवे यांची हरिनाम गजरात कीर्तन सेवा रुजू झाली. या सप्ताहात आळंदीकर भाविक,नागरिकांनी श्रवण सुखाची पर्वणी लाभणार आहे.ङ्ग श्रींचा जन्मोत्सव २६ ऑगस्ट रोजी पहाटे घंटानाद, काकडा, श्रीना पवमान अभिषेक पूजा, दुधारती, ११ ब्रम्हवृन्दाचा वेदघोष अभिषेक होणार आहे. आळंदी देवस्थान तर्फे श्रीची गोकुळ पूजा होईल. त्यानंतर वंशपरंपरेने मानकरी संतोष मोझे यांचे वतीने हरिजागर सेवा होईल. श्रीचे जन्मोत्सव प्रसंगी पुष्पवृष्टी, आरती, सुंठवडा प्रसाद, उपवासाची खिरापत, मानकरी, सेवक यांना नारळ प्रसाद वाटप प्रथा परंपरेने वाटप होत आहे. २७ ऑगस्ट रोजी काल्याचे कीर्तन सेवेने सांगता होणार असल्याचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. आळंदी मंदिरातील परंपरांचे पालन करीत श्रींचे जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठीची मंदिरातील तयारी पूर्ण झाली आहे. माऊली मंदिरातून पंढरपूर येथील वारकरी तसेच महिन्याचे वारकरी आदींना निमंत्रण देण्यात आले आहे.ङ्ग गोकुळाष्टमी सप्ताहासाठी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ञ राजेंद्र उमाप , विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथजी, विश्वस्त भावार्थ देखणे, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम माने, श्रीचे सेवक चोपदार बाळासाहेब रणदिवे, राजाभाऊ रंधवे, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, राजेंद्र आरफळकर, संस्थानचे सेवक मानकरी, कर्मचारी वृंद भाविक,नागरिक यांचे माध्यमातून तयारीसह नियोजन केले जात आहे. या जन्मोत्सवातील विविध धार्मिक उपक्रमात भाविक, नागरिकांनी सहभागी वाहावे असे आवाहन आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ञ राजेंद्र उमाप यांनी केले आहे.

कृष्ण जन्माष्टमी हा एक प्रसिद्ध हिंदू सण आहे. जो भगवान कृष्णाच्या पूजेला समर्पित आहे, त्यांचा जन्मोत्सव देशासह परदेशातही साजरा केला जातो. कृष्ण जन्माष्टमी दिनी श्रीकृष्ण आणि माऊली जन्मोत्सव आळंदीत देखील मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

## भोसरीत भाजप रुजवणारे लांडगे घराणे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत

भोसरीतील भाजपचे माजी नगरसेवक रवि लांडगे यांनी मंगळवारी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला. मुंबईतील



मातोश्री येथे हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रवि लांडगे यांच्या हातात शिवबंधन बांधून त्यांचा पक्ष प्रवेश करून घेतला. रवी लांडगे हे भाजपचे पाहिले नगरसेवक कै.बाबासाहेब लांडगे यांचे मुलगे असून भाजपचे माजी अध्यक्ष व नगरसेवक राहिलेले स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांचे पुतणे आहेत. पक्ष प्रवेशानंतर बोलताना उद्धव ठाकरे यांनी भोसरी विधानसभेवर आता भगवा फडकल्याशिवाय राहणार नसल्याचे सांगितले. तसेच भोसरी मतदारसंघात येऊन सभा घेणार असून, त्यावेळी जे काही बोलायचे ते बोलणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्याचप्रमाणे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी भोसरी मतदारसंघात शिवसेनेचाच आमदार असेल, असे स्पष्टपणे सांगितले. यावेळी खासदार संजय राऊत, सचिनजी अहिर, मिलिंद नार्वेकर, सुलभा उबाळे इ नेते व हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

## कात्रीत घावलेल्या पत्रकार शेख यांनी जिल्हाधिकारी यांच्या नवीन कार्यालयासमोर आंदोलनास प्रारंभ

सोलापूर : ( सैफन शेख ) एका बाजूला स्वातंत्र्याच्या तुताऱ्या वाजत असताना अन्यायाला बळी पडलेला नागरिक न्यायासाठी टाहो फोडत असंच काहीसं विदारक चित्र स्वातंत्र्यदिनी,गुरुवारी १५ ऑगस्ट रोजी आंदोलन गेट म्हणून सर्व परिचीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुनम गेटवर दिसून आले. आंदोलक पत्रकार सैफन शेख यांना त्याच्या न्याय्य मागण्यासाठी पुनम गेटवर आंदोलकाच्या आंदोलनाची गर्दी झाली. शेवटी सैफन शेख जिल्हाधिकारी नवीन कार्यालयासमोर ठिय्या मांडण्याची वेळ आल्याचे दिसून आले.




याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी,सर्वत्र स्वातंत्र्य दिनाची लगबग सुरू असताना,गुरुवारी पुनम गेटवर न्याय मागणीसाठी आंदोलन करणारे इतके पिढीत आले कित्येकांना धरणे आंदोलनास बसण्यासाठी पुनम गेटवर जागाच उरली नाही. त्यावेळी आंदोलक पत्रकार सैफन शेख यांना आंदोलनासाठी जागा मिळावी म्हणून संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांशी ते बोलले. त्यांच्याकडून आंदोलनासाठीच्या जागेचा प्रश्न निकाली न निघाल्यामुळे आंदोलक सैफन शेख यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधला.

त्या कॉल ला प्रतिसाद न मिळाल्याने आंदोलक सैफन शेख यांनी अपर जिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना संपर्क साधला, व धरणे आंदोलनास बसण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनीही तिथेच बसा असं सांगून कॉल कट केला.

एका बाजूने जिल्हा प्रशासनाचे असहकाराचं धोरण तर दुसऱ्या बाजूला गुन्हे दाखल करण्याची पोलिसांकडून धमकी अशा कात्रीत घावलेल्या पत्रकार शेख यांनी जिल्हाधिकारी यांच्या नवीन कार्यालयासमोर आंदोलनास प्रारंभ केला. यावेळी माध्यमांशी बोलताना आंदोलन करते शेख म्हणाले की

त्यावेळी संबंधित पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी ते आंदोलन थांबविण्यास सांगून लोकशाहीत अन्याय पीडित नागरिकाचा जणू आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. पत्रकार शेख यांची धरणे आंदोलन करण्याची भूमिका ठाम असल्याने त्यांच्या मागणीला अनुसरून पोलिसांनी त्यांना पुनम गेट जवळच जागा उपलब्ध करून दिली सोमवारी आंदोलनाचा तिसरा दिवस होता.

## राज्याचा विरोधी पक्षनेता विरोधकांचा मुख्यमंत्री – खासदार प्रणिती शिंदे

चंद्रपूर - राज्याचा विरोधी पक्षनेता म्हणजे, आमच्या बाजूचा म्हणजे विरोधकांचा मुख्यमंत्री असतो. विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार धाडसी आहेत, त्यांना सर्वांना घेऊन चालण्याची कला अवगत आहे या शब्दात, खासदार प्रणिती शिंदे यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर स्तुती सुमने उधळली.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या पुढाकाराने ४५ कोटी रुपये खर्चून अड्याळ (जानी) येथे आयोजित विपश्यना केंद्राच्या भूमिपूजन व





तथागत गौतम बुद्धांच्या मूर्ती वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता.मुख्य अतिथी म्हणून थायलंड येथील वाट साकेत धम्म स्कूल रॉयल मठ पाली विभागाचे प्रोफेसर डॉ. फ्रामहा फोंगसाथोर्न धम्मभणी, पाली विभागाचे प्रा. फ्रामाहा सुपाचै सुयानो, तर प्रमुख अतिथी म्हणून खासदार प्रणीती शिंदे, खासदार बलवंत वानखेडे, खासदार डॉ. नामदेव किरसान, कॅप्टन नटिकेट थायलंड, सिनेअभिनेता गगन मलिक, काँग्रेस अनुसूचित जाती सेलचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार, ॲड राम मेश्राम, माजी जि.प. अध्यक्ष सतीश वारजुरकर मंचावर उपस्थित होते.याप्रसंगी भाषणात काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी विजय वडेट्टीवार यांचे जाहीर कौतुक केले. विरोधी पक्षनेता म्हणजे या बाजूचा मुख्यमंत्री असतो. त्यांना मुख्यमंत्र्यानंतर मान असतो असे सूचक भाष्य केले. विजय वडेट्टीवार धाडसी आहेत, सर्वांना घेऊन चालतात असेही खासदार शिंदे म्हणाल्या.

## नुमवि शिशु शाळेत संस्कृत दिन रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा

सोलापूर : ( सैफन शेख ) नुमवि शिशु शाळेत मंगळवारी संस्कृत दिन रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मोठा



गट सारंग मधील महेश दळवी व स्वाती दळवी या पालकांना आमंत्रित करण्यात आले होते. ङ्गङ्गया कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलाने करण्यात आली. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी संस्कृत भाषेचे महत्व,संस्कृत दिनाची माहिती तसेच रक्षाबंधन या सणाची माहिती सांगितली. त्यानंतर मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते समुद्र देखाव्याचे पूजन करून नारळ अर्पण करण्यात आला.ङ्गङ्गयावेळी मोठा गट सारंग मधील अनिकेत भीमनाथ या विद्यार्थ्याने कोळी बांधव तर केदार गट मधील प्रगती आळंद ह्या विद्यार्थिनीने कोळीणीचीवेशभूषा अतिशय उत्तमरीत्या केली होती. त्यांनी कोळी गीताची झलक करून दाखवली मुख्याध्यापिका यांनी प्रमुख पाहुणे दळवी यांना राखी बांधली. तसेच अलका ओक यांनी बहीण आणि भाऊ यांचे अतुट असलेल्या नात्यांचे गीत सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कविता बडीगेरी यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक प्रमुख अलका ओक व आरती मराठेयांनी मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

## सोलापुरात आज मेगा फर्टिलिटी कॅम्पचे आयोजन

सोलापूर:अपोलो फर्टिलिटी,सोलापूरने,आपल्या प्रगत प्रजनन उपचाराद्वारे कुटुंबांना आनंद आणि पालकत्व मिळवून देण्याचा महत्त्वपूर्ण प्रवास म्हणून तीन वर्षे पूर्ण झाल्याचा आनंदोत्सव साजरा केला.या महत्त्वपूर्ण उपलब्धीचा आनंद साजरा करण्यासाठी,सम्राट चौकातील अपोलो फर्टिलिटी सोलापूर,(आज) २१ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत सेंटरमध्ये मेगा फर्टिलिटी कॅम्पचे आयोजन करत केले आहे.या कॅम्पमध्ये सहभागींना मोफत नोंदणी,सल्लामसलत आणि स्कॅन,स्पॉट आयव्हीएफ बुकिंगवर विशेष सवलत आणि एक खास ''स्कोअर ओव्हर इन्फर्टिलिटी स्क्रीनिंग पॅकेज'' यासह अनेक फायदे मिळतील.

## फौजी' चित्रपटात सौरभ आणि प्राजक्ताची जोडी

सोलापुर: मराठी चित्रपटामध्ये वेगळ्या विषयांसोबतच आजकाल नायक-नायिकेच्या अनोख्या जोड्याही पहायला मिळतात. चित्रपटेच्या कथेसोबत हल्ली फ्रेश जोडी ही तितकीच महत्त्वाची ठरू लागली आहे हे लक्षात घेऊनच दिग्दर्शक नव्या जोड्यांना प्राधान्य देऊ लागले आहेत.मराठी रुपेरी पडद्यावर अशीच आणखी वेगळी एक जोडी लवकरच पहायला मिळणार आहे.ती जोडी आहे सौरभ गोखले आणि प्राजक्ता गायकवाडची. 'फौजी' या चित्रपटातून ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.मातृपितृ फिल्म्स निर्मित.. घनशाम येडे प्रस्तुत 'फौजी' हा मराठी चित्रपट येत्या ३० ऑगस्टला चित्रपटगृहात दाखल होत आहे.या चित्रपटाच्या निमित्ताने हे दोघे प्रथमच एकत्र आले

संपादकीय

## “स्वामित्व धन

सुमारे पाव शतकाहून अधिक वर्षे न्यायप्रविष्ट असलेल्या या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ जणांच्या खंडपीठाने ८–१ अशा बहुमताचा निकाल दिला. पेट्रोलजन्य घटक वगळता कोळसा, लोह, लोहखनिज, तांबे, बॉक्साईट आदी खनिजांस हा निकाल लागू होतो. मुळात हा खटला ‘मिनरल एरिया डेव्हलपमेंट ऑथोरिटी विरुद्ध स्टील ऑथोरिटी ऑफ इंडिया’ या नावे ओळखला जातो. त्यात पुढे झारखंड, प. बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक ही राज्ये उतरली आणि या सर्वांनी मिळून केंद्राच्या अधिकारांस आव्हान दिले. ही सर्व राज्ये खनिजसंपन्न आहेत; हे ओघाने आलेच. ही राज्ये ‘स्वामित्व मूल्य’ (रॉयल्टी) आकारून खनिजे काढण्याची कंत्राटे सरकारी वा खासगी कंपन्यांस देतात; हा प्रघात. जेव्हा काही राज्यांनी या स्वामित्व मूल्याखेरीज खनिकर्म उद्योगावर आणखी कर आकारला त्या वेळी त्यात बदलाचा प्रयत्न झाला. त्यास न्यायालयात आव्हान दिले गेले आणि दोन स्वतंत्र टप्प्यांवर सात आणि पाच सदस्यांच्या खंडपीठाने दोन स्वतंत्र निकाल दिले. यातील एका निकालात ‘स्वामित्व मूल्य’ म्हणजेच कर असा निष्कर्ष होता, तर दुसऱ्या पीठाने कर आणि स्वामित्व मूल्य हे दोन भिन्न मुद्दे असल्याचे सांगितले. अशी मतभिन्नता झाल्याने अंतिम निवाड्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नऊ न्यायाधीशांचे स्वतंत्र पीठ यासाठी स्थापन केले. दस्तूरखुद्द सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासह हृषीकेश रॉय, अभय ओक, जे. बी. पारडीवाला, मनोज मिश्रा, उज्जल भुयान, सतीश चंद्र शर्मा आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीहा तसेच न्या. बी. व्ही. नागरत्ना यांचा यात समावेश होता. यातील आठ न्यायाधीशांचे “स्वामित्व धन आणि कर हे दोन भिन्न मुद्दे आहेत आणि राज्यांना स्वामित्व धनाखेरीज स्वतंत्र कर आकारणी करण्याचा अधिकार आहे” यावर एकमत झाले आणि न्या. नागरत्ना यांनी स्वतंत्रपणे आठ मुद्द्यांद्वारे आपली मतभिन्नता नोंदवली. त्यांच्या मते “जमीन हा विषय जरी राज्यांच्या अखत्यारीत असला तरी त्या जमिनींखालील खनिजे आणि मूलद्रव्यांवर केंद्र सरकारचा हक्क असतो; सबब राज्यांना त्यावर कर आकारण्याचा हक्क नाही.” सर्वोच्च न्यायालयातील आठ न्यायमूर्तींनी हा मुद्दा नाकारला. स्वामित्व मूल्य आणि कर या दोन मुदलात स्वतंत्र बाबी आहेत, स्वामित्व मूल्य म्हणजे कर नाही आणि जमीन हा मुद्दा घटनेनुसार राज्यांच्या अखत्यारीत असल्याने त्या जमिनीतून निघणाऱ्या खनिजावर राज्यांस अधिकार नाही असे म्हणता येणार नाही, असे न्या. चंद्रचूड लिखित बहुमताच्या निकालात स्पष्ट केले गेले. आता प्रश्न या निकालाच्या पूर्वलक्ष्यी प्रभावाचा.

त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाशी पूर्णांशाने सहमत होणे अवघड. यातून खाण कंपन्यांस किमान दोन लाख कोटी रुपये विविध राज्यांच्या तिजोरीत भरावे लागतील. या खाण कंपन्यांची बाजू घ्यावी असे काहीही नाही, हे खरे. तेव्हा त्यांच्या पर्यावरण–दुष्ट पोटास चिमटा बसत असेल तर त्याचा सामान्यजनांस आनंदच व्हायला हवा. परंतु तरीही त्यांना तुम्ही काही वर्षांपूर्वी जे केले त्यावर तेव्हापासून आजतागायत कर आकारणे अन्यायाचे ठरते. कोणतीही वसुली ही उत्तरलक्ष्यीच असायला हवी. या संदर्भात एक बरे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने राज्यांवर पूर्वलक्ष्यी करवसुली करताना विलंब शुल्क, कर रकमेवर व्याज आदी आकारण्यास सक्त मनाई केलेली आहे. मूळ रक्कम तेवढी मागेपासून आकारली जाईल. तसेच या पूर्वलक्ष्यी कराची वसुली एका टप्प्यात केली जाणार नाही. तरीही ही रक्कम मोठी आहे. झारखंड या एकट्या राज्यानेच सुमारे दीड लाख कोटी रुपये वसुलीची अपेक्षा यावर व्यक्त केली. दुसरे असे की पूर्वलक्ष्यी वसुलीच्या आपल्या आठवणी. व्होडाफोन प्रकरणात असा पूर्वलक्ष्यी प्रभावाने करवसुलीचा निर्णय तत्कालीन अर्थमंत्री प्रणब मुखर्जी यांनी (२०१२) घेतला. ते प्रकरण आंतरराष्ट्रीय पातळीवर अंगाशी आले. मुद्दा होता व्होडाफोनने दुसरी एस्सार टेलिफोन या कंपनीवर स्वामित्व मिळवले त्या व्यवहाराचा. यावर ‘कॅपिटल गेन्स टॅक्स’ पूर्वलक्ष्यी प्रभावाने दिला जावा असे अर्थमंत्री प्रणबदांस वाटले. या काँग्रेसी अर्थमंत्र्याचे एका विशेष उद्योगघराण्याशी असलेले मधुर संबंध यामागे किती आणि प्रामाणिक कर गरज किती या प्रश्नाच्या उत्तरात न जाताही त्याची आठवण उद्योगविश्वास आजही अस्वस्थ करते. हे जू मानेवरून उतरण्यास जवळपास नऊ वर्षे गेली. तेव्हा प्रश्न असा की हा इतिहास असतानाही सर्वोच्च न्यायालयाने खाणप्रकरणी अशी मुभा का दिली? तशी ती दिली नसती आणि सर्व करवसुली उत्तरलक्ष्यी प्रभावाने ठेवली असती तर अधिक गुंता झाला असता,

# वाशिष्ठी डेअरी प्रकल्प आयोजित भन्नाट रिल्स स्पर्धेचे रियान अकबाने व साहिल गुरव ठरले विजेते

### आगळ्या – वेगळ्या स्पर्धेचे मान्यवरांनी केले कौतुक बक्षीस वितरण समारंभाला स्पर्धकांनी दिली उत्स्फूर्त दाद

चिपळूण (ओंकार रेळेकर)– शिट्यांचा आवाज,,, टाळ्यांच्या कडकडाटात जल्लोष करीत वाशिष्ठी डेअरी प्रकल्प आयोजित भन्नाट रील पारितोषिक वितरण समारंभाला रिल्स स्पर्धकांनी उत्स्फूर्त दाद दिली. तर रिल्समुळे गंभीर वातावरण देखील उपस्थितीतांना अनुभवास मिळाले. छोट्या गटात रियान अकबाने तर मोठ्या गटात साहिल गुरव या स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कमेसह आकर्षक सन्मानचिन्ह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले. या आगळ्या- वेगळ्या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे असलेले सुप्रसिद्ध अभिनेते शंतनु मोघे यांच्यासह अन्य मान्यवरांनी कौतुक केले.ङ्गङ्गवाशिष्ठीचे कोकणातील प्रत्येक माणसाशी अतूट नातं आहे, हे नातं विस्तारु या चला, वाशिष्ठीबद्दल तुम्हाला काय वाटतं,



आम्हालाही जाणून घ्यायचं आहे. या अंतर्गत वाशिष्ठी डेअरी–शेतक– यांची स्वप्नसिद्धी, वाशिष्ठी डेअरी कोकणात समृद्धीचा मार्ग, भन्नाट रील बनवा–वाशिष्ठी डेअरी प्रॉडक्ट्स सोबत आणि प्रशांत यादव यांनी कोकणात निर्माण केलेली पहिली दुग्ध क्रांती असे या रिल्स स्पर्धेतील विषय होते.या स्पर्धेचा बक्षीस समारंभ नुकताच चिपळूण बहादूरशेखनाका येथील संस्थेच्या सहकार भवन येथे उत्साहीपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण, संचालिका सौ. स्मिता चव्हाण, व्हाईस चेअरमन अशोक साबळे, तसेच सर्व संचालक, वाशिष्ठी डेअरी प्रकल्पाचे चेअरमन प्रशांत यादव, मुख्य प्रवर्तक सौ. स्वप्ना यादव, प्रसिद्ध अभिनेते शंतनू मोघे, प्रसिद्ध लेखक दिग्दर्शक राजन बने, सुप्रसिद्ध स्तंभ लेखक पराग वडके, कोकणातील सुप्रसिद्ध कंटेंट क्रिएटर संदेश फडकले आदी उपस्थित होते.या स्पर्धेला तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून रिल्स वाशिष्ठी डेअरी प्रकल्पाकडे पाठवण्यात आले आहेत.

यामध्ये ९० नॉमिनेशन आले होते.यातून छोट्या गटात प्रथम क्रमांक रियान अकबाने, द्वितीय क्रमांक सानिका मयेकर, तृतीय क्रमांक गार्गी कदम तर मोठ्या गटात प्रथम क्रमांक साहिल गुरव, द्वितीय क्रमांक अहमद खतीब तर तृतीय क्रमांक विभागून वेदांत पवार आणि प्रद्युम्न देवधर यांना देण्यात आला. या सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवरांचे असते रोग रकमेसह आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.ङ्गतर टॉप टेनमध्ये सिद्धार्थ कोळवणकर, उदय करंजकर, वेदांत शितप, सतीश लिंगायत, रोशन आंग्रे, सागर शिरकर, अपूर्वा शिर्के, निखिल सकपाळ, आकाश गुप्ता, अवधूत उतेकर यश मिळवले. या टॉप टेन विजेत्यांसह सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

शॉर्टफिल्म मध्ये विजेता निसार शेख तर उपविजेता अनिल फाळके ठरला यांचा देखील गौरव करण्यात आला. बक्षीस वितरण प्रसंगी स्पर्धकांसह उपस्थित व मान्यवरांमध्ये जल्लोष दिसून आला. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी वाशिष्ठी डेअरी प्रकल्पाचे अध्यक्ष प्रशांत यादव व मुख्य प्रवर्तक सौ. स्वप्ना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी वर्गाने मेहनत घेतली.

# क्रियाशील उर्दू शिक्षक व त्यांना सहकार्य करणारे ग्रामस्थ यांचा महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीने केला गौरव !

चिपळूण शहरातील स्वातंत्र्यपूर्व काळातील एका उर्दू शाळेची यशोगाथा लक्षात घेऊन त्या शाळेतील शिक्षक जिया उल्ला खान व बहादुरशेख जमातुल मुस्लिमीन सचिव अस्लमभाई वांगडे यांचा सत्कार प्रत्यक्ष शाळेत जाऊन महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीचे वतीने करण्यात आला.



एक वर्षांपूर्वी या शाळेची पटसंख्या फारच कमी झाली होती. अशी अवस्था असताना जियाउल्ला खान सर बदलीने या शाळेमध्ये हजर झाले त्यावेळी शाळेची पटसंख्या चार होती. आज वैशिष्ट्य असे त्या शाळेची पटसंख्या २४ असून शाळेने स्वतःची बालवाडी सुरू केली आहे. बालवाडी मध्ये सुद्धा ११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे या बालवाडी शिक्षिकेचा पगार आणि शाळेचा कायापालट करण्यासाठी झालेला खर्च बहादूरशेख मोहल्यातील ग्रामस्थ करत आहेत. शिक्षक व ग्रामस्थ जबाबदारीने काम करत असताना शोकांतीका अशी की वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या या शाळेकडे प्रशासनाचे हवे तितके लक्ष नाही. धडपडणा–या व उल्लेखनीय काम करणा–या शिक्षकाच्या व ग्रामस्थांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीने या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. ङ्ग या कार्यक्रम प्रसंगी बहादूरशेख जमातुल मुस्लिमीन सचिव व शाळा व्यवस्थापन समिती शिक्षणतज्ज्ञ अस्लमभाई जाफर वांगडे , मौलाना जाबिर कासमी , शराफत मुल्लाजी , सदफ चिपळूणकर , अफसाना चिपळूणकर व महिला पालक उपस्थित होते. संघटनेच्या वतीने जिल्हा नेते प्रदीप पवार , जिल्हाध्यक्ष यशवंत पेढांबकर , जिल्हा कोषाध्यक्ष महेश मोरे , तालुकाध्यक्ष व तज्ज्ञ संचालक शशिकांत सकपाळ , तालुका सरचिटणीस सुरेश धुमाळ उपस्थित होते.ङ्ग मुख्याध्यापक झिया खान व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अस्लमभाई वांगडे यांनी संघटनेच्या या उपक्रमाचे कौतुक करून मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त केले.

# जि.प.आदर्श शाळा काताळे या शाळेत स्वातंत्र्य दिनी शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप..! संकल्प ग्रुप मुंबई यांचा स्तुत्य उपक्रम..!

आबलोली (संदेश कदम)

ङ्ग गुहागर तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा काताळे नं. १ येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. १५ ऑगस्ट ७८व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संकल्प ग्रुप मुंबई यांच्याकडून विद्यार्थ्यांना डिजिटल साहित्य लॅपटॉप चे वाटप करण्यात आले. याचबरोबर गॅस शेगडी, कुकर, चटया, कॅरम,वॉटर बॅग, कंपास तसेच क्रीडा विषयक साहित्य, पोषण आहाराचे साहित्य,भौतिक साहित्याचे वाटप केले.यावेळी संकल्प ग्रुप – मुंबई संस्थापक– अमोल भातडे,अध्यक्ष




– रंजित भातडे,उपाध्यक्ष – रुपेश वीर,ङ्गसचिव – चिंतामणी धनावडे,ङ्गउपसचिव – सुमित घवाली,खजिनदार – दर्शन बंगाल,उपखजिनदार– हितेश हाडल,हिशेब तपासनीस – संकेत वीर,संपर्क प्रमुख – संकेत बाचीम,सल्लागार – नारायण धनावडे,सदस्य – प्रदिप बलेकर, दिप्तेश उन्हाळेकर, प्रमोद भुवड हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा अर्पिता बारस्कर या होत्या. यावेळी संकल्प ग्रुप चे संस्थापक मा. श्री. अमोल भाटडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्वतःला कमी लेखू नका. तुमच्यात आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी ठेवलात तर यश नक्की मिळेल असा संदेश विद्यार्थ्यांना दिला.यावेळी काताळे अंगणवाडी सेविका आर्या रसाळ व आरती सुर्वे यावर्षीचा उत्कृष्ट अंगणवाडी सेविका पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य माननीय श्री विनायक बारस्कर,अमृत महोत्सव कमिटी अध्यक्ष माननीय श्री. गिरीश कदम, सामाजिक कार्यकर्ते श्री.यशवंत पवार, मा. श्री. नामदेव बारस्कर, पोलीस पाटील मा. श्री. सचिन रसाळ आदी. मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम चे सूत्रसंचालन उपशिक्षक श्री. दीपक चव्हाण यांनी केले. तर प्रास्ताविक मुख्याध्यापिका माधवी पाटील यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. आभार प्रदर्शन पदवीधर शिक्षक श्री. कांबळे सर व सोनवलकर सर यांनी केले.

# आंबेरे खुर्द तंटामुक्ती समीती अध्यक्षपदी श्री. पांडुरंग गणपत पाते यांची अविरोध निवड..!

आबलोली (संदेश कदम) गुहागर तालुक्यातील निर्मल ग्रामपंचायत आंबेरे खुर्द या ग्रामपंचायतीच्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी जेष्ठ समाज सेवक श्री. पांडुरंग गणपत पाते यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.



शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामसभेत सर्वानुमते जेष्ठ समाजसेवक श्री. पांडुरंग गणपत पाते यांची अविरोध निवड करण्यात आली. आणि टाळ्यांचा कडकडाट झाला.

या ग्रामसभेत ग्रामसेवक श्री. हरिश कुलये , सरपंच श्री. रविंद्र अवेरे, माजी पंचायत समिती सदस्य श्री. विजय भूवड, मुख्याध्यापक श्री. महाकाळ, श्री. वसावे यांच्यासह सर्व समाजातील प्रमुख ग्रामस्थांच्या व विशेष करून महिलांच्या बहूसंख्य उपस्थितीत हि निवड करण्यात आली असून नवनिर्वाचित तंटामुक्ती समीती अध्यक्षपदी निवड करण्यात आलेल्या श्री.

पांडुरंग गणपत पाते यांचेवर आंबेरे खुर्द पंचक्रोशी मधून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत. नवनिर्वाचित तंटामुक्ती समीती अध्यक्ष श्री. पांडूरंग गणपत पाते यांनी गावाच्या विकासासाठी सर्व समाजाला बरोबर घेऊन जाऊन गावाचा एकोपा अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्नशील रहाणार असल्याचे सांगून सर्वांना धन्यवाद दिले

# २५ ऑगस्ट २०२४ रोजी चिपळुणमध्ये राज्यस्तरीय जागर साहित्य संमेलन

सह्याद्री समाचार न्यूज चॅनेल आणि पसायदान प्रतिष्ठान गुहागर आयोजित राज्यस्तरीय जागर साहित्य संमेलन रविवार दि. २५ऑगस्ट रोजी दुपारी ३ वा. बाळशास्त्री जांभेकर सभागृह, लोकमान्य टिळक वाचनालय,जुन्या भैरीजवळ, चिपळुण येथे आयोजित करण्यात आले आहे.सह्याद्री समाचार वर्धापनदिन सोहळा निमित्त हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.संमेलनाचे उद्घाटक व संमेलनाध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक श्री. विश्वास पाटील (पानिपतकार, प्रसिद्ध साहित्यिक)हे आहेत.तर मा. श्री. शेखर निकम सर (आमदार चिपळूण- संगमेश्वर विधानसभा)मा.श्री. प्रशांत यादव साहेब (प्रसिद्ध उद्योजक) मा. श्री सदानंद चव्हाण साहेब(माजी आमदार)मा.सौ. स्वप्ना यादव (मुख्य कार्यकारी अधिकारी ,चिपळूण नागरी सह. पतसंस्था)मा.श्री. चंद्रकांत भोजने साहेब (प्रसिध्द उद्योजक)मा.श्री.सतीश कदम (संपादक, कोकण एक्सप्रेस)मा.श्री. प्रमोद गांधी साहेब (मनसे संपर्क अध्यक्ष, गुहागर)श्री.डॉ. श्रीकांत पाटील (प्रसिध्द साहित्यिक कोल्हापूर) श्री. दि.. बा. पाटील (ज्येष्ठ साहित्यिक सांगाली)श्री. नितीन ठसाळे (राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष)श्री.महंमद हुसैन मुसा(साहित्याचे अभ्यासक) ङ्गश्री.दशरथ दाभोळकर (सामाजिक कार्यकर्ते)यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे साहित्य संमेलनात ‘‘पसायदान राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०२३‘‘ वितरण सोहळा संपन्न होणार आहे.ज्यामध्ये पसायदान राज्यस्तरीय काव्यपुरस्कार विजेते संकरणातील गिरकी (कवी श्री भास्कर हांडे) (प्रसिद्ध साहित्यिक, पुणे)अरुणावत श्री रमेश सरकाटे (प्रसिद्ध लेखक, गझलकार, भुसावळ)यांना सन्मानित करण्यात येईल तरङ्गडॉ. नागनाथ कोतापल्ले सर्वोत्कृष्ट बहुचर्चित कादंबरी पुरस्कार श्री देवा झिंझाड (प्रसिद्ध लेखक, पुणे)यांच्या एक भाकर तीन चुली आणि रावण राजा राक्षसांचा या श्री. शरद तांदळे (प्रसिद्ध लेखक, पुणे)यांच्या कादंबरींना प्रदान करण्यात येणार आहे.

सह्याद्री विशेष काव्य पुरस्कार श्री. शशिकांत कापसे (पनवेल)यांना प्रदान करण्यात येणार आहे.यावेळी पुस्तक प्रकाशन समारंभात प्रा. सुहास बारटक्के लिखित कथा संग्रह ‘‘वशाट आणि इतर कथा‘‘आणि ‘‘कथा विविधा ‘‘ चे प्रकाशन करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालक श्री. दिपक कारकर (निवेदक, पत्रकार)करतील.पुरस्कार वितरण नंतर राज्यस्तरिय निमंत्रितांचे कविसंमेलन प्रसिद्ध कवी श्री. अजय कांडर (कणकवली)यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून प्रमुख अतिथी म्हणून सफरअली इसफ (सिंधुदुर्ग)आणि श्री.मांगीलाल राठोड (प्रसिद्ध कवी बुलढाणा) हे उपस्थित राहणार आहेत.कवी संमेलनाचे निवेदन संजय बोरुडे (प्रसिद्ध साहित्यिक अहमदनगर)करतील. निमंत्रित कवींमध्ये मान्यवर कवी श्री.प्रतिक कळंबटे (सनगिरी),श्री. बाबासाहेब राशीनकर(गुहागर)मधुकर मातोंडकर(सिंधुदुर्ग)योगेश बंडागळे(चिपळूण)श्री. संजय कदम (चिपळूण) श्री. प्रदीप मोहिते (चिपळूण)श्री. गोपाळ कारंडे(मुंबई)श्री. मयुरेश माने,ओंकार विजय गुरव (गुहागर)श्री चंद्रकांत बाबर (मिरज) ईश्वर हलगरे (गुहागर) संदेश सावंत(सावर्डे) संदेश पवार(चिपळूण),कु. सिध्दी चाळके(खेड) ,संदीप येलये(आगवे),अमित जावळे(गुहागर) या कवींच्या दर्जेदार कवी संमेलनाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन सह्याद्री समाचारचे संपादक शाहीर शाहीद खेरटकर आणि ज्येष्ठ साहित्यिक बाळासाहेब लबडे यांनी केले आहे.

# गणपती, गोकुळाष्टमी सण शांतता व सलोखा टिकून राहण्यासाठी पाली पोलीस स्टे. येथे शांतता कमिटीची बैठक

जनतेने सहकार्य करावे: पो. नि सरिता चव्हाण

रायगड जिल्हा

उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

पाली पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची सभा आयोजित करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण मॅडम यांनी सांगितले





की गोकुळाष्टमी, गणपती सण जवळ आले असून मुंबई ठाणे कडून येणारे चाकरमानी यांचा प्रवास अडथळा न येता पालीतून सुखाचा व्हावा. यासाठी पोलीस स्टेशन कटीबद्ध आहे. शिवाजी चौक ते गणपती मंदिर पर्यंत पोलीस बंदोबस्त ठेवला जाईल. कुठे वाहतुकीस अडथळे येणार नाही याची काळजी आम्ही घेऊ. गणपतीसाठी पार्किंग व्यवस्थेबाबत पाली एसटी विभागाला पत्र देऊ, तसेच शांतता कमिटी मध्ये काही उपस्थि तानी सुचविल्या पार्किंग व्यवस्थेबाबत आम्हाला सहकार्य करावे. तसेच सार्वजनिक गणेश मंडळाने रस्त्यावर त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. लाऊड स्पीकर चा आवाज मर्यादित ठेवा जेणेकरून कोणालाही त्रास होणार नाही. येणाऱ्या सणासुदीला आमचा बंदोबस्त असणार आहेत. परंतु आपले सहकारी महत्त्वाचे आहे. सणासुदीला कुठलाही गैरप्रकार होणार नाही याची काळजी आम्ही घेऊ, आपण ही घ्या आणि आम्हा पोलिसांना सहकार्य करा. या सभेच्या वेळी उपस्थित मराठा समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी आपला प्रस्ताव मांडला की गणपतीच्या सणाच्या अगोदर दोन दिवस पूर्वी गणपती घेऊन जाण्यासाठी तसेच सामान भरण्यासाठी चाकरमानी यांची गर्दी असते. गणपती नेण्यासाठी टेम्पो, प्रायव्हेट गाड्या, ऑटो रिक्षा याचा वापर केला जातो. यामुळे कुठे ही अडचण व रस्त्याला अडथळा येऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त या दोन दिवसासाठी ठेवणे फार जरुरीची आहे अशी आपले मत स्पष्ट केले.

तसेच शांतता कमिटी सभासदांनी सांगितले की नो पार्किंग मधून येणाऱ्या गाड्यांवर बंधन ठेवणे जरुरी आहे. तसेच पाली रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे वाहनांना अडथळा येऊन ट्रॅफिक होऊ शकते यासाठी पर्यायी व्यवस्था करावी. याबाबत नगराध्यक्ष शेळके मॅडम यांनी सांगितले की गणपती सणाच्या अगोदर आम्ही सर्व खड्डे बुजवू , जेणे करून कुठे अडथळे येणार नाही अशी ग्वाही शांतता कमिटीत नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी दिली. यावेळी सर्व जाती-धर्माच्या लोकांनी गणपती सणासाठी सहकार्य करून गणेशोत्सव आनंदात पार पाडावा आम्हाला सहकार्य करावे असे पीआाय सरिता चव्हाण मॅडम यांनी सांगितले. यावेळी उपस्थित शांतता कमिटी सदस्य, पाली नगरसेवक, समन्वय समिती अध्यक्ष अनुभव दादा कुलकर्णी, भाजपा राजेश भाऊ मपारा, पत्रकार बंधू विनोद भोईर, मंगेश यादव, निशांत पवार, गायकवाड, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पोलीस ठाणे येथे नवीन रुजू झालेले पोलीस निरीक्षक सूर्यवंशी यांनी ही या शांतता कमिटी सभेला हजेरी लावली होती.

## दिवंगत व्हि. के. जाधव यांच्या रूपाने आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू आणि धाडसी नेता हरपला- रामदास आठवले

पाली /बेणसे

(धम्मशील सावंत )

आंबेडकरी बहुजन चळवळीतील धडाडीचे नेतृत्व, कोकण नेते व्हि. के. जाधव हे चळवळीत कायम सक्रिय राहिले. आजन्म निस्वार्थी आणी स्वाभिमानी बाण्याने आपले जीवन समाज , राष्ट्र आणी देशहितासाठी समर्पित केले. बहुजन महापुरुष, महानायिका यांचे लढावू, क्रांतिकारी, परिवर्तन वादी विचार घराघरात तळागळात पोहचविण्याचे त्यांनी हयात भर काम केले. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी क्षेत्रात त्यांचे काम मोठे राहिले आहे. निष्ठावान कार्यकर्ते घडविण्याचे त्यांनी काम केले. दिवंगत नेते व्हि. के जाधव यांच्या रूपाने आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू आणि धाडसी नेता हरपला आहे. त्यांच्या निधनाने आंबेडकरी बहुजन चळवळीची मोठी हानी झाली असल्याचे शोकाकुल उदगार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काढले. ङ्गङ्ग ना. रामदास आठवले यांनी नागोठण्यातील सर्वश्रुत आणि प्रख्यात असलेल्या शांतिदूत या निवास स्थानी दिवंगत व्ही.के. जाधव यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी आठवले यांनी व्हि. के. जाधव यांच्या पत्नी सुनंदा आई जाधव, सुपुत्र संजय वसंत जाधव, सून संध्या जाधव, मुलगी मनीषा रवींद्र मोरे, जावई रवींद्र गोपाळ मोरे, मंगल शिलानंद साळवी, शिलानंद साळवी, संतोष देवराम कांबळे आदी कुटुंबियांतील सदस्यांसमवेत चर्चा करताना दिवंगत व्हि. के. जाधव यांच्या निस्वार्थी आणि लढावू कार्याला उजाळा दिला. यावेळी रोहा तालुक्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील निवेदन देण्यात आले. तसेच रिलायन्स नागोठणे कंपनीत सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या देण्या संदर्भात रामदास आठवले यांनी रिलायन्स व्यवस्थापनाचे अधिकारी यांच्याशी दूरध्वनी वर चर्चा करून जलद कार्यवाही करण्यास सांगितले.

ङ्गङ्ग यावेळी रिपाइं रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड,युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक, राहुल डाळिंबकर, पनवेल महानगरपालिका विधानसभा क्षेत्र जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे, रिपाइं नेते सिद्धार्थ कासारे,रोहा तालुका अध्यक्ष संतोष गायकवाड, सुधागड तालुका अध्यक्ष राहुल सोनावळे, अलिबाग तालुका अध्यक्ष सुनिल सप्रे, शरद पाटील,शिंदे सर रोहा, उद्योजक भगवान बिनेदार, संदीप मोहिते, प्रभाकर ओव्हाळ, दीपक दाभाडे, विलास कांबळे, प्रशिक बिनेदार, सिद्धार्थ गायकवाड, जगदीश वाघमारे, महापरिवर्तन वादी पत्रकार संघांचे राज्य अध्यक्ष धम्मशील सावंत आदिसह रि. पा. इं नेते पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘स्मार्ट’

जम्मू काश्मिरात सर्व कसे सुरळीत आहे हे दाखवण्यास केंद्र उत्सुक असेल. पण पूर्ण राज्याचा दर्जा देणे हे सुरळीतपणाचे प्रमाण ठरेल पंतप्रधानांनी ‘एक देश, एक निवडणूक’ या संकल्पनेचा पुनरुच्चार करून चोवीस तास उलटत नाहीत तोच निवडणूक आयोगाने चार राज्यांसाठी दोन स्वतंत्र निवडणूक कार्यक्रम उघड केले. त्यानुसार जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या राज्यांच्या निवडणुका लगेच सप्टेंबरात होऊन ऑक्टोबराच्या पहिल्या आठवड्यात त्यांचे निकाल लागतील. दुसऱ्या टप्प्यात दीपावलीनंतर महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांत निवडणुका होतील. अशा विभागणीतून या यंत्रणेच्या स्वायत्ततेचे दर्शन घडते असे लाडक्या भोळ्या-भाबड्या भक्तगणांस वाटत असल्यास त्यांचा आनंद हिरावून घेण्याचा अधिकार ‘इंडिया’स नाही. आयोगाने असे केले त्यात अर्थातच श्रेष्ठींची सोय आहे. त्यामागे दोन प्रमुख कारणे भक्तेतरांस दिसतील. एक म्हणजे एकाचवेळी अधिकाधिक ठिकाणी श्रेष्ठींस प्रचारात झोकून देता यावे हा. दुसरा मुद्दा आयोगाच्या स्त्रीदाक्षिण्याचा. निवडणुका लांबविल्यास महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींची रक्षाबंधनास सुरू झालेली ओवाळणी भाऊबीजेपर्यंत लांबवता येणे आणि झारखंडाच्या मुख्यमंत्र्यांमागे आणखी काही शुक्लकाष्ठे लावण्यास अधिक मुभा मिळणे. हे झाले आयोगाने न घेतलेल्या निर्णयाचे विश्लेषण. आता घेतलेल्या निर्णयाविषयी. म्हणजे हरियाणा तसेच जम्मू-काश्मीर या राज्यांतील निवडणुकांविषयी.

प्रथम हरियाणा. या राज्यात एकाच टप्प्यात १ ऑक्टोबरास निवडणुका होतील. सध्या त्या राज्यात प्रेमळ राज्यपालांच्या सौजन्याने भाजप सत्तेत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांत भाजपच्या या राज्यातील खासदारांची संख्या शंभर टक्क्यांवरून पन्नास टक्क्यांवर आली. म्हणजे १०चे पाच झाले. यापेक्षाही अधिक चिंतेची बाब म्हणजे मतांचे प्रमाण एकाच झटक्यात १२ टक्क्यांनी घटले. राज्याच्या एकूण ९० पैकी ४४ विधानसभा क्षेत्रांत भाजपस काहीसे मताधिक्य मिळाले. याउलट काँग्रेस ४२ तर ‘आम आदमी पक्ष’ चार क्षेत्रांत आघाडीवर राहिला. लोकसभेचे वेगळे, विधानसभेचे निराळे हे खरे असले तरी यातून राजकीय वाऱ्यांची दिशा लक्षात येते. या दिशेत दोन कारणांनी बदल होऊ शकतो. भाजप स्वबळावर किती आश्वासक चेहरा त्या राज्यास देऊ शकतो, हे एक. आणि काँग्रेस, ‘आप’ हे ‘इंडिया’ आघाडी घटक किती पोक्तपणा दाखवू शकतात. खेरीज काँग्रेसला आपले बुलंद हरयाणवी भूपिंदर-दीपिंदर हुडा हे पितापुत्र आणि कुमारी सेलजा यांच्यातील संघर्षासही विराम द्यावा लागेल. त्या राज्यात काँग्रेसला पराभूत करण्यासाठी काँग्रेस इतकी ताकद भाजपत नाही. वर ‘आप’ची स्वतंत्र लढण्याची भुणभुण हा धोका आहेच. या आव्हानांवर काँग्रेस कशी मात करते आणि दुसरीकडे भाजपचे अजूनही भिरभिरलेले मुख्यमंत्री नायब सिंग सैनी हे माजी मनोहरलाल खट्टर यांच्या सावलीतून बाहेर येऊन काही करू शकतात का आणि त्यासाठी नरेंद्र मोदी आदींच्या साह्याचा किती उपयोग होतो यावर हरियाणात काय होईल हे ठरेल.

तथापि या निवडणुकीचे नायकत्व आहे ते जम्मू-काश्मिराकडे. तब्बल दहा वर्षांनी या राज्यातील मतदारांच्या तर्जनीस विधानसभा निवडणुकीची शाई लागेल. त्याआधी राष्ट्रप्रेमी भाजप आणि राष्ट्रद्रोही मेहबूबा मुफ्ती यांच्या ‘पीडीपी’ यांची सत्ता होती. ते सरकार भाजपच्या इच्छेनुसार गेले. पुढे २०१४ नंतर त्या राज्याने लोकनियुक्त सरकार पाहिलेले नाही. नंतर तर तीन वर्षांनी त्या राज्यास विशेष दर्जा देणारे ‘अनुच्छेद ३७०’ निष्प्रभ केले गेले आणि त्या राज्याची दोन शकलेच केली गेली. त्यानंतरच्या पाच वर्षांत या राज्याने काय कमावले याचा वेध ‘लोकसत्ता’ने अलीकडेच (६ ऑगस्ट) ‘लालयेत पंचवर्षाणि’ या संपादकीयात घेतला. या दहा वर्षांत बरेच काही घडले. त्यात श्रीनगर हे ‘स्मार्ट’ बनणार होते ते राहिले ही अत्यंत गौण बाब. हा स्मार्टनेस येण्याआधीच त्या शहरास पुराने कसे विदीर्ण केले याच्या आठवणी अद्यापही ताज्या असतील. तेव्हा श्रीनगरचे स्मार्ट होणे राहिलेच. पण केंद्राने २०२२ साली राज्यातील मतदारसंघांची पुनर्रचना करून हिंदूबहुल जम्मू परिसरातून अधिक आमदार येतील आणि त्याचवेळी मुसलमानबहुल काश्मीर खोऱ्यातून इतकी वाढ होणार नाही, याची खात्री करून घेतली. त्यानुसार जम्मूतून या विधानसभेत पूर्वीच्या ३७ ऐवजी आता ४३ म्हणजे सहा आमदार अधिक येतील तर काश्मिरातून एक. अशा तऱ्हेने यंदाच्या ९० आमदारांत जम्मूतील ४३ आणि काश्मिरातील ४७ असतील. ही मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यानंतर काही महिन्यांत दुर्दैवाने दहशतवाद्यांनीही आपल्या ‘धोरणांची’ फेरआखणी केली. परिणामी जम्मूतील दहशतवाद वाढला आणि काश्मिरातील घटला. ही नवी डोकेदुखी.

ती वाढत असतानाच लोकसभा निवडणुका झाल्या. तीत दहशतीत जगणाऱ्या जम्मू-काश्मिरातील नागरिकांनी सुखासीन दक्षिण मुंबईतील नागरिकांपेक्षा आपण अधिक लोकशाहीवादी आहोत हे दाखवून दिले. लोकसभा निवडणुकीत या राज्यात सरासरी ५८ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. त्यात काश्मीर खोऱ्यातून ‘नॅशनल कॉन्फरन्स’चे दोन, जम्मूत भाजपचे दोन आणि बारामुल्लासारख्या तप्त मतदारसंघातून शेख रशीद अहमद ऊर्फ इंजिनीअर रशीद हा निवडून आला. तो ‘अवामी इत्तेहाद पार्टी’चा. त्याने एकाच वेळी पीपल्स कॉन्फरन्सच्या साजिद गनी लोन आणि नॅशनल कॉन्फरन्सचे माजी मुख्यमंत्री साक्षात फारुख-सुपुत्र ओमर अब्दुल्ला या दोन तगड्यांना हरवले. हा धक्का एवढाच नाही. हा इंजिनीअर रशीद दहशतवाद्यांस मदत केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात आहे. त्याच्या प्रचाराची धुरा स्थानिक तरुणांनी उत्स्फूर्तपणे सांभाळत प्रस्थापितांना धूळ (की बर्फ?) चारण्यात यश मिळवले. इतकेच नाही. या निवडणुकीत एकेकाळच्या फुटीरतावादी पण भाजपच्या सहकार्याने राष्ट्रवादी झालेल्या माजी

# काटेरी निवडुंग व रसदार रोपांचा अनोखा साज, घराची शोभा वाढविण्यासाठी व भेट देण्यासाठी पसंती

पाली /बेणसे (धम्मशील सावंत )

परसात व घरांमध्ये तसेच शेतघर किंवा ऑफिसमध्ये प्रामुख्याने फुलझाडे व वेगळ्या शोभिवंत झाडांना पसंती होती. मात्र काटेरी निवडुंग व जाड पानांची रसदार वनस्पतींची रोपे घर, ऑफिस व परसबागेची शोभा वाढवतील असं कोणी फारसा विचार केला नव्हता परंतु आता या वनस्पतींना अनेक जण पसंती देत आहेत. घराची शोभा वाढविण्यासाठी, प्रतिष्ठा व भेट देण्यासाठी प्रामुख्याने या रोपांचा वापर होत आहे.ङ्ग निवडुंग याला इंग्रजीमध्ये कॅक्टस व जाड पानांची रसदार वनस्पतींना सकूलंट असे म्हणतात. जिल्ह्यातील बहुसंख्य रोपवाटिकांमध्ये निवडुंग व जाड पानांची रसदार वनस्पतींची विविध प्रकारची रोपे विक्रीसाठी ठेवली आहेत. आणि यामुळे रोपवाटिका धारकांना चांगले उत्पन्न सुद्धा मिळत आहे. सर्वसामान्य नागरिक देखील आवर्जून ही झाडे खरेदी करतात. काही वेगळेपणा जोपासण्यासाठी, नवीन काही करण्यासाठी व घर, ऑफिस आणि परसबाग आकर्षक दिसण्यासाठी, तसेच घराचा व ऑफिसचा मेकओव्हर करण्यासाठी या झाडांचा उपयोग करतात. तसेच कोणाचा वाढदिवस असो गृहप्रवेश, सेवानिवृत्ती कार्यक्रम, सत्कार समारंभ किंवा इतर कार्यक्रम व समारंभ आदी ठिकाणी भेट म्हणून कॅक्टस व सकुलंट वनस्पती भेट म्हणून दिल्या जातात. अगदी फ्रेंडशिप डे निमित्त सुद्धा भेट म्हणून दिले जात आहेत. गणपती उत्सवात आरास सजावटीसाठी देखील या रोपांचा वापर केला जातो. असे असतात निवडुंग व सुकूलंट सकुलंटमध्ये जाड मांसल पाने किंवा देठ असतात काहींच्या पानांना काटे असतात. तर निवडुंग यांना पाने नसतात काटे असतात. काही निवडुंग वनस्पतींना पाने देखील असतात. या वनस्पतींना कमी प्रमाणात पाणी व खत लागते. परंतु त्यांना भरपूर प्रकाश आवश्यक आहे. पाण्याचा निचरा होणाऱ्या वालुकामय जमिनीत ती चांगली वाढतात. सापेक्ष आर्द्रता कमी असलेल्या घरांमध्ये ते चांगल्या प्रकारे जुळवून घेतात. ङ्गचौकट २ङ्गअनेकांची पसंतीङ्ग विशेष म्हणजे या वनस्पतींची फार निगा राखण्याची व लक्ष देण्याची फारशी गरज नसते. दिसायला देखील चांगली, आकर्षक व लक्षवेधी ठरतात. तसेच कुंड्यांमधून कुठेही सहज नेता येतात. कुंड्यांमध्ये टांगून देखील ठेवता येतात. टेबलावर व खिडकीमध्ये देखील सहज राहतात. या झाडांना पाहून वेगळा आनंद व शांतता मिळते, ताण नाहीसा होतो. आदी कारणांमुळे ही झाडे अनेकांच्या पसंतीस उतरतात. ङ्गङ्गचौकट ३ङ्गविविध प्रकार ङ्ग सुक्युलेंट्स व निवडुंग चे प्रकार १५० पेक्षा जास्त आहेत. यामध्ये पॅडल प्लांट (कालांचो थायरसिफ्लोरा), गाढवाची शेपटी (सेडम मॉर्गेनिअम), फायरस्टिक्स (युफोर्बिया तिरुकल्ली रोजा), स्पायडर एलो (एलो ह्युमिलिस), इच्छेवेरिया इनडोअर सुकुलंट्सचे मध्ये सिंहासनाचा मुकुट (युफोर्बिया मिली), जेड प्लांट (क्रॅसुला ओवाटा), पिनकुशन कॅक्टस (मॅमिलरिया क्रिनिटा), स्नेक प्लांट (सॅनसेव्हेरिया ट्रायफॅसियाटा), मेडुसा (ॲस्ट्रोफिटम कॅपुट-मेड्यूसा) आदी प्रकार आहेत. तर कमी प्रकाशातील इनडोअर सकुलंट्स मध्ये, कोरफड अलोवेरा, हॉलिडे कॅक्टि, रहिपसलीस आदींचा समावेश आहे. घर व फार्महाऊस आदी ठिकाणी कॅक्टस व सकुलंट प्रकारच्या वनस्पतींचा वापर केला आहे. या वनस्पती अतिशय आकर्षक दिसतात. शिवाय त्यांचे वेगवेगळे गुणधर्म आणि आकार सर्वांचे लक्ष वेधून घेतात. त्यांच्याकडे पाहून मनाला एक शांतता मिळते ताण नाहीसा होतो. तसेच त्यांची फारशी देखभाल करावी लागत नाही.विक्रम कुमठकर, फार्महाऊस धारक, रोहा सध्या कॅक्टस व संकुलंट प्रकारच्या वनस्पतींना अधिक मागणी आहे. आकार तसेच विविध प्रजाती यांच्यानुसार त्यांच्या किमती वेगवेगळ्या आहेत. इतर वनस्पती व रोपांनुसार यांच्या किमती देखील आवाक्यात आहेत. शोभिवंत झाडे व फुलांच्या झाडांबरोबरच आता कॅक्टस व संकुलन प्रकारच्या झाडांनी रोपवाटिका व्यापल्या आहेत. शिवाय इतर वनस्पती खरेदी करण्यासाठी आलेले ग्राहक आवर्जून एक तरी कॅक्टस किंवा सकुलंट वनस्पती घेऊन जाते. यामुळे व्यवसाय देखील चांगला होतो.ङ्गअमित निंबाळकर, रोपवाटिका मालक, पाली

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
बुधवार २१ ऑगस्ट २०२४ 

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना

शनिवार दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी महा. राज्यसरचिटणीस, मा. नगराध्यक्ष वैभवजी खेडेकर साहेब यांना इंग्लिश मिडीयम व इतर अनेक शाळां मध्ये

वेळ बदलन्याबाबत आणि वडापाव किंवा इतर पदार्थ पार्सल करत



असताना न्युज पेपर

चा वापर न करता बटर पेपर चा वापर व्हावा या बाबत निवेनदन देताना उपजिल्हाध्यक्ष, मा. नगरसेवक सचिन गायकवाड, मंडणगड उपतालुक्ध्यक्ष मुस्तकीन कारविनकर, अवधुत जाधव शाखाध्यक्ष, म्हाप्रळ, यावेळी मनविसे जिल्हाध्यक्ष पुष्पेन्द्र दिवटे, कामगार संघटना सरचिटणीस संजय आखाडे, विजय चव्हाण, प्रविण पोवार उपस्थित होते.

## चि.अर्चिस अरूण नाकरेकर याच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना मोफत ओळखपत्र व खाऊ वाटप

दिनांक १५/८/२०२४ रोजी ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने खोपोली नगरपरिषद शाळा क्रं १० राजीव गांधी प्राथमिक शाळा मुळगाव खोपोली येथे



श्री.अरुण रा. नाकरेकर (सेक्रेटरी श्री विश्वकर्मा सुतार चॅरिटेबल ट्रस्ट रायगड जिल्हा) यांच्यातर्फे त्यांचा मुलगा चि.अर्चिस अरूण नाकरेकर याच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना मोफत ओळखपत्र व खाऊ वाटप करण्यात आले त्यावेळी चि. अर्चिस अ.नाकरेकर, त्याचे वडील श्री अरुण नाकरेकर, त्यांच्या मातोश्री सौ.भारती नाकरेकर तसेच, ओबीसी समाजा च्या तालुका अध्यक्षा, सुतार पत्रिका कॅलेंडर महाराष्ट्र वार्ताहर प्रतिनिधी सौ आसावरी घोसाळकर.खोपोली. सौ मयुरी अनिल गोलिपकर रोहा, गावातील पोलिस पाटील, श्री.गणेश ठाकरे परिवार , श्री.गोरखनाथ सानप सर, तेजश्री थोरात मॅडम अणि शाळेचे मुख्याध्यापक श्री. नीलेश अनंत थरकुडे यांनी खूप सुंदर असे आयोजन करून त्यांच्या सर्व टीम च्या सहकार्याने कार्यक्रम छान पार पडला..

## पोफळी शैक्षणिक संकुलात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात साजरा..



परशुराम एज्युकेशन सोसायटी चिपळूण संचालित न्यू इंग्लिश स्कूल व प्राथमिक शाळा पोफळी मध्ये रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

बहीण भावाच्या अतूट नात्याचा सण म्हणजे रक्षाबंधन.प्रशालेतील इयत्ता पहिली ते दहावीतील सर्व वर्गांमध्ये बहिणींनी भावांना औक्षण करून राख्या बांधल्या.भावांनी बहिणींना भेट वस्तू दिली.कार्यक्रमासाठी विद्यार्थिनींनी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या तसेच फुलांची सजावट केली होती.या कार्यक्रमानिमित्त सर्व विद्यार्थ्यांनी रंगीत ड्रेस घातले होते.सर्व विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून चिक्की देण्यात आली.कार्यक्रमासाठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री.शरद सोळुंके सर व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांनी शुभेच्छा दिल्या.ङ्कप्राथमिक व माध्यमिक विभागाच्या महिला शिक्षकांनी या कार्यक्रमाचे अत्यंत चांगल्या प्रकारे नियोजन केले होते.

आपल्या संस्कृतीची ओळख आणि ✻जपणूक व्हावी यासाठी शाळा विविध सण साजरे करते तसेच स्पर्धांचे आयोजन करते.

## देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय देव्हारे मध्ये शाळा व्यवस्थापन समितीची सभा उत्साहात संपन्न

देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यलयात शाळा व्यवस्थापन समितीची सभा दिनांक १९/८/२०२४ रोजी घेण्यात आली या




सभेच्या अध्यक्ष स्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. रामचंद्र कापसे होते,, या सभेमध्ये व्यवस्थापन समितीचे सदस्य, श्री, जितेंद्र दवंडे, श्री रवींद्र पवार, श्री, विपुल म्हाब्दी, तसेच श्री. सचिन कंचावडे व शिक्षक सदस्य म्हणून श्री. संदे सर उपस्थित होते. सदर सभेमध्ये, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठीची चर्चा घडून आली. प्राचार्य कापसे सरांनी विद्यालयासाठी आवश्यक बाबी सभेपुढे मांडल्या, तसेच शाळा सुरक्षा ऑडिट करण्यात आल. शेवटी संदे सर यांनी सगळ्यांचे आभार मानले व सभेची सांगता झाली.

## तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेत कोळवली हायस्कूलच्या मुलींचा खो-खो संघ विजेता तर मुलांचा खो-खो संघ उपविजेता

आबलोली

(संदेश कदम)

क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा कार्यालय विभाग रत्नागिरी यांच्या वतीने सन २०२४/२५ या शैक्षणिक वर्षासाठीच्या तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा नुकत्याच पालपेणे हायस्कूलच्या भव्य क्रीडा मैदानावर संपन्न झाल्या. या स्पर्धेत ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था पंचक्रोशी कोळवली या हायस्कूलच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने खो-खो या क्रीडा प्रकारामध्ये जबरदस्त कामगिरी करत व क्रीडा कौशल्य आणि दमदार चलाखी दाखवत अव्वल स्थान पटकावले. त्याचबरोबर मुलांच्या खो-खो संघानेही १७ वर्षाखालील गटात उपविजेतेपद मिळवून क्रीडा क्षेत्रातील शाळेच्या नावाचा दरारा कायम ठेवला आहे.ङ्कतालुकास्तरावर घवघवीत यश संपादन करणाऱ्या व उपस्थितांची वाहवा मिळवणाऱ्या मुलींच्या आणि मुलांच्याही संघाचे ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.शांताराम वाघे , संस्थेचे उपाध्यक्ष



श्री.बाबाजी मुंडेकर,सचिव श्री.नारायण मोहिते ,सहसचिव श्री. शंकर जोशी,संस्थेचे सदस्य श्री.वासुदेव डिंगणकर, श्री.नंदकिशोर सुर्वे,श्री.दामोदर डिंगणकर,श्री.रामचंद्र मोरे,श्री.सदानंद जोशी,श्री. रवींद्र गावडे.श्री.संतोष डिंगणकर तसेच श्री.अमोल वाघे,श्री.संतोष आंब्रे,श्री. वामन जाधव,श्री.एस.आर.मुलाणी या सर्वांनी अभिनंदन केले तसेचङ्कविद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक श्री.बाळासाहेब लवटे.श्री.सी.एस.पांडे. चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री.विकास कदम. यांचेही कौतुक आणि अभिनंदन केले.ङ्कशाळेचे मुख्याध्यापक श्री.एम. वाय.पाटील व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कु.आदित्य भोस्तेकरचे मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत उत्तुंग यश.

चांदोरे माणगाव प्रतिनिधी : नंदकुमार चांदोरकर

माणगाव : ना.म.जोशी विद्याभवन गोरेगावमध्ये शिक्षण घेत असलेला कु.आदित्य महादेव भोस्तेकर याने मंथन प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये सलग तिसऱ्या वर्षी उत्तुंग यश मिळवत गोरेगाव केंद्रामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. रायगड



जिल्ह्यातून १२ वा, तर राज्यामध्ये २४ वा क्रमांक प्राप्त करून उत्तुंग यश मिळवल्याबद्दल ना.म. जोशी विद्याभवन संस्थेचे चेअरमन आणि संचालकांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त त्याचे विशेष कौतुक केले. कु.आदित्य हा लहानपणापासूनच अतिशय हुशार आणि कुशाग्र बुद्धिमत्तेचा असून विविध वक्तृत्व स्पर्धा तसेच बुद्धिबळ स्पर्धांमध्ये त्याने आजवर खूप पारितोषिके मिळवली आहेत. मंथन प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये र.का. गांधी प्राथमिक विद्यामंदिर मधून सलग तीन वर्षे गोरेगाव केंद्रामध्ये अव्वल स्थानावर टिकून आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे आणि त्याच्या मार्गदर्शक शिक्षकांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## तोंडाला काळीफिती बांधून खोपोली मुस्लिम समाजातर्फे निषेध.

रामगिरी महाराज यांना अटक करा पोलिसांना दिले निवेदन.

,अलिबाग प्रतिनिधी

राजेश बाष्टे :

समाजात गैरसमज पसरवून प्रेषित मोहम्मद पैगंबर साहेब यांच्याबाबत अपशब्द वापरून धार्मिक भावना दुखावून सामाजिक तेढ निर्माण करून शांतता भंग करीत असलेल्या रामगिरी महाराज यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याकरिता खोपोली येथील सर्व मुस्लिम समाजाच्या वतीने खोपोली पोलीस स्टेशन यांना निवेदन देण्यात आले आहे.ङ्कङ्कसदर निवेदन देण्याकरिता मुस्लिम समाजाचे शेकडो नागरिक पोलीस स्टेशन येथे जमा झाले होते तसेच सर्व नागरिकांनी तोंडावर काळ्या फिती बांधून शांततेने निषेध व्यक्त केला.ङ्कङ्ककोणताही धर्म इतर धर्माबाबत टीका करण्याचे शिक्षण देत नाही तसेच मुस्लिम समाज प्रत्येक धर्माचा आदर करतो आणि पूर्वीपासून करीत आलेला आहे. परंतु सध्या धर्माचे राजकारण सुरू आहे, धार्मिक भावना भडकावून जातीय दंगली होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे समाजात जातीय दंगली होऊ नये व शांतता व सालोख्याचे वातावरण रहावे व भारतीय संस्कृतीची विविधतेतून एकतेची प्रतीक आहे त्या संस्कृतीचे रक्षण व्हावे व समाजात दंगली होऊन सामाजिक नुकसान होऊ नये याकरिता रामगिरी महाराज विरुद्ध धार्मिक भावना दुखावण्याचा उद्देशाने शब्द उच्चारण, धार्मिक भावना भडकावणे, धर्मावरून गटांमधील वैर वाढवणे, शांतता भंग करण्याच्या हेतूने अपमान करणे आणि गुन्हेगारी धमकी देणे याकरिता भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई होणे जरुरीचे आणि आवश्यक आहे. त्याकरिता मुस्लिम समाज एकत्र येऊन सदर तक्रार अर्ज देत आहे असे मुस्लिम समाजातर्फे सांगण्यात आले.ङ्कङ्कमुस्लिम समाज संविधानाचा आदर करतो व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला दिलेल्या संविधानाच्या मर्यादे अंतर्गतच आम्ही रामगिरी महाराज यांना अटक करावी अशी मागणी करत आहोत असे मुस्लिम समाजातर्फे सांगण्यात आले.




## मौजे टाकेडे गावात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मुख्यमंत्री साहेब यांचे माणले आभार

मंडणगड प्रतिनिधी

दापोली विधानसभा मंडणगड तालुक्यातील भिंगळोली पंचायत समिती गणांत मंडणगड महिला तालुका प्रमुख सौ. अमिता शिंदे व युवा सेना महिला शहर प्रमुख सौ. संपदा भगत यांनी मौजे टाकेडे या गावात आज मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळून त्यांचे खात्यात पैसे जमा झालेल्या सर्व महिला यांनी एकत्र कार्यक्रम येऊन मुख्यमंत्री साहेब यांचे माणले आभार मानले.सधर योजना महिला वर्गात पोहोचविणेसाठी महिला आघाडी शिवसेना तालुका संघटीका सौ. अमिता शिंदे मॅडम श्री. शिंदे गुरुजी तसेच टाकेडेतील अंगणवाडी सेवीका सौ. अमिता गणवे ङ्कआणि मीरा चव्हाण यानी प्रयज्ञ केले. या योजनेमुळे महिला वर्गात आनंदाचे वातावरण पसरले असुन महिला भगिनिनी समाधान व्यक्त केले. ज्यानी हि योजना कार्यान्वीत केली ,त्या महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री माननिय एकनाथजी शिंदे साहेब तसेच दापोली मतदार संघाचे आमदार योगेशदादा कदम साहेब व शासनाचे आभार व्यक्त करुन या सार्याना



धन्यवाद दिले.या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष श्री. सिताराम सुर्वे श्री. शिंदे गुरुजी , शाखा प्रमुख अनिल गणवे महिला उपशाखा प्रमुख अपर्णा चव्हाण उत्कर्ष महिला मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. राजश्री. चाळके बहुसंख्य महिला उपस्थित होत्या. त्याच प्रमाणे श्री. सदाशिव कदम श्री. पांडुरंग आयरे श्री. मारुती गणवे श्री .राजाराम कोळंबेकर हे उपस्थीत होते.शेवटी शिंदे गुरुजी यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

पुणे विभागीय कार्यालय पत्ता : बालाजी नगर कळ्ळ्ञ्च बँक शेजारी कुडाळकर क्लास पहिला मजला पुणे जिल्हा कार्यालय दैनिक सूर्योदय – अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती), संपर्क : ९६२३२३०४२६

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )